Annual Report 2019-20




# बुलडाणा अर्बन
को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., बुलडाणा

# Buldana Urban
Co-op. Credit Society Ltd., Buldana

मल्टिस्टेट रजि. नं. 267

ISO-9001:2000 SA-8000:2001 Certified

# : संचालक मंडळ :



**श्री.राधेश्याम देवकिसनजी चांडक**
संस्थापक – अध्यक्ष



**सौ. कोमलताई झंवर**
अध्यक्षा



**श्री.कांतीलाल छाजेड**
उपाध्यक्ष



**डॉ. श्री. सुकेश झंवर**
चिफ मॅनेजिंग डायरेक्टर



**डॉ. श्री. किशोर केला**
संचालक



**श्री. अंबेश बियाणी**
संचालक



**श्री. अजय सेंगर**
संचालक



**श्री.नंदकिशोर झंवर**
संचालक



**श्री.नंदकिशोर बाहेती**
संचालक



**श्री. किशोर महाजन**
संचालक



**श्री. विनोद केडिया**
संचालक



**डॉ.श्री. विनोद भंडारी**
संचालक



**श्री.सुबोध काकाणी**
संचालक



**श्री.दिनेश गांधी**
संचालक



**श्री. गोपाल चिरानिया**
संचालक



**श्री. शिरीष देशपांडे**
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे विभाग

# आदरांजली

या आर्थिक वर्षामध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या
सामाजिक, राजकीय क्षेत्रातील महनीय व्यक्ती, शास्त्रज्ञ, सैन्य व पोलीस दलातील जवान
त्याचप्रमाणे संस्थेचे सभासद, कर्मचारी त्यांचे कुटूंबीय, आप्त मृत्यू पावले आहेत.....
त्या सर्वांच्या आत्म्यास मुक्ती मिळो ही प्रार्थना !



We sincerely pay our homage to
those nationally and internationally
famous personalities who worked in the field of
Social Work, Science, Politics, Defence, Police Force…
Members of the Society, their family members, relatives…
... who have passed on into the bright light.

**– बुलडाणा अर्बन परिवार –**

**बँकर्स :–**
- बँक ऑफ इंडिया,क्षेत्रीय कार्यालय नागपूर
- इंडियन ओव्हरसीज बँक
- युनियन बँक ऑफ इंडिया
- यस बँक, मुंबई
- कॉर्पोरेशन बँक
- आय सी आय सी आय
- ॲक्सिस बँक

**वैधानिक लेखापरीक्षक**
- मे. व्हि.आर.इनामदार ॲन्ड कंपनी
  चार्टर्ड अकाऊंटंट, नागपूर
- मे. कासट तोतला ॲन्ड अचेलिया असोसिएटस्
  चार्टर्ड अकाऊंटंट, जळगांव खां.
- **आर्बिट्रेटर**
  श्री. सतिष भुतडा
  मा. सेंट्रल रजिष्ट्रार दिल्ली
  यांनी नियुक्त केलेले

**सल्लागार**
- श्री. रवीन्द्र खापरे,ॲडव्होकेट,हायकोर्ट, नागपूर
- श्री. सचिन वैद्य, चार्टर्ड अकाऊंटंट, बुलडाणा
- श्री. जितेंद्र कोठारी, ॲडव्होकेट, बुलडाणा
- श्री. विनोद गांधी, चार्टर्ड अकाऊंटंट, नागपूर
- श्री. विशाल तोतला, चार्टर्ड अकाऊंटंट,जळगांव
- श्री. उमेश झंवर, चार्टर्ड अकाऊंटंट, जालना



**राधेश्याम चांडक**
संस्थापक अध्यक्ष

## मनोगत...

माझ्या प्रिय सभासद बंधू भगिनींनो...

कोरोना महामारीच्या या संकट काळात आपण आपल्या पतसंस्थेची आमसभा घेत आहोत. कोरोना च्या जागतिक महामारीमुळे अनेकांचं दिवाळं निघालं, कित्येकांच्या नोकऱ्या गेल्या तर काही जणांच्या घरी प्रियजनांच्या निधनानं वियोगाचा शोक अनावर झाला. भरीस भर म्हणून की काय या वर्षीच्या अवकाळी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे सुध्दा मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. कोरोनाच्या जागतिक महामारीमध्ये ज्या निरपराध व्यक्तींचे निधन झाले त्या सर्वांना सर्वप्रथम आपल्या सर्वांच्या वतीने भावपूर्ण विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो.

गेल्या तीन-चार वर्षांपासून भारतीय अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर बदल झाले. जसे नोटबंदी, जीएसटी यासारख्या मोठ्या निर्णयामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर जो परिणाम झाला त्यातुन बँकिंग क्षेत्रही सुटले नाही. कशीबशी अर्थव्यवस्था सावरते न सावरते तोच डिसेंबर २०१९ पासून कोवीड-१९ च्या महामारीने संपूर्ण जगालाच हादरा दिला. जगात कोट्यावधी लोक कोरोना बाधित झाले आणि भारतात सुध्दा लाखो लोकांना या आजाराचा सामना करावा लागला. भारतामध्ये सर्वात जास्त कोवीड-१९ चे रुग्ण आपल्या महाराष्ट्रात असून त्यांची संख्या प्रचंड मोठी आहे. जगात सर्वात जास्त कोरोना रुग्ण असलेल्या देशांमध्ये अमेरिकेनंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो आणि या महामारीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर मोठा विपरीत परिणाम झाला आहे. छोट्या-मोठ्या कंपन्या, लहान-मोठे उद्योग बंद पडलेत आणि यांचा बँकिंग क्षेत्रावर सुध्दा विपरीत परिणाम झाला.

२०२०-२१ या आर्थिक वर्षात बँकांच्या एनपीए मध्ये वाढ होणार असून त्याचा विपरीत परिणाम सर्व बँका, पतसंस्था यांच्या नफ्यार दिसून येणार आहे. सन २०२१ पर्यंत ही महामारी

नियंत्रणात येईल असे आज तरी वाटत नाही. यावर पर्याय म्हणून बँका व पतसंस्थांना आपली कर्जे पुनर्गठित करावी लागणार आहे.

आपल्या संस्थेच्या ३४ वा वार्षिक अहवाल सादर करतांना मला अतिशय आनंद होत आहे. संस्था स्थापन होऊन चौतीस वर्षाचा कालावधी पूर्ण झाला आहे. संस्थेने सुरुवातीपासून ग्राहकहित सेवा व सभासद हितालाच प्राधान्यक्रम दिला आहे. गेल्या ३४ वर्षापूर्वी बारा हजार रुपये भांडवल आणि ७२ सभासद घेऊन सुरु झालेल्या संस्थेचा आज रोजी वटवृक्षाप्रमाणे विस्तार झाला असून संस्थेच्या ४६३ शाखा, ६६८ गोदामे, ऑनलाईन सेवा, १५ हजार २०० कोटीचा व्यवसाय या प्रचंड यशांमध्ये संस्थेचे सर्व सभासद, संचालक व कर्मचारी यांचा सिंहाचा वाटा आहे हे सांगताना मला अभिमान वाटतो.

संस्थेने नेहमीच सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून आपला ठसा उमटवला आहे. कोरोनाच्या काळात सुध्दा आपल्या विविध शाखांच्या माध्यमातून मोल मजुरी करणारे, कामगारांना लॉक डाऊनच्या काळात किराणा व अन्नधान्याचे वाटप आपण केले आहे. जवळपास दहा हजार गरजू परिवारांना आपण किराणा व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले आहे. शासनाने परवानगी दिल्यानंतर महाराष्ट्रातून परराज्यात जाणारे मजूर आपल्या संस्थांच्या ज्या ज्या शाखांच्या भागातून जात होते त्या शाखांमार्फत त्यांचे जेवणाची, नाष्ट्याची, पिण्याच्या पाण्याची सर्व व्यवस्था आपल्या संस्थेमार्फत करण्यात आली होती.

संस्थेने शेतकरी हिताला सुरुवातीपासूनच प्राधान्य दिले आहे. शेतकरी सभासदांसाठी ग्रामीण गोदाम योजना संस्थेने सुरु केली. आज संस्थेकडे ६६८ गोदाम असून त्यापैकी २४१ गोदामे आपल्या स्वमालकीची आणि भाडेतत्वावर घेतलेली ४२७ गोदामे आपल्याकडे आहेत. माल साठवण्याची क्षमता ९४ लक्ष ८० हजार क्विंटल इतकी आहे. याचा लाभ संस्थेच्या सर्व शेतकरी सभासदांना होत आहे. त्याबरोबरच संस्थेने भारतीय कपास निगम, कॉटन फेडरेशन ऑफ महाराष्ट्र व ओलम ॲग्रो यांच्याशी संस्थेच्या गोदामात कापूस गठाणी साठवण बाबतचा करार केला असून याचा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा होत आहे. गोदाम पावती योजना राबविणारी बुलडाणा अर्बन राज्यात एकमेव पतसंस्था आहे. बाजारामध्ये येणाऱ्या तेजी–मंदी चा लाभ शेतकऱ्यांनी गोदामात त्यांचा माल साठवल्यामुळे त्यांना मिळत आहे. आवश्यक तेव्हा सदर मालावर तात्काळ अर्थसाहय आपण शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देतो, त्यामुळे त्यांची आर्थिक गरज पूर्ण होते. संस्था नेहमी शेतकरी सभासद हित लक्षात घेऊन विविध योजना राबवित असते म्हणून शेतकरी सभासदांसाठी संस्थेने चिखली येथे सात हजार मेट्रिक टनाचे कोल्डस्टोरेज उभारले असून सभासदांची मागणी पाहता मलकापूर येथे पाच हजार मेट्रिक टनाचे कोल्डस्टोरेची उभारणी झाली असून त्यांचे उद्‌घाटन महाराष्ट्र राज्याचे अन्न व औषध कॅबिनेट मंत्री मा.डॉ.श्री. राजेंद्र शिंगणे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले आहे. वर्धा येथे प्रत्येकी पाच हजार मेट्रिक टनाचे कोल्डस्टोरेज बांधकाम सुरु असून लवकरच जालना येथे सुध्दा आपली संस्था कोल्डस्टोरेज उभारत आहे. याचा लाभ त्या त्या परिसरातील शेतकरी सभासदांना होणार आहे.

शासन शेतकऱ्यांना हमीभाव मिळावा म्हणून नाविन्यपूर्ण उपक्रम सुरु करत असून खाजगी क्षेत्रातील संस्था शेतकऱ्याचा माल खरेदी करु शकतील, अशी योजना आणत आहे. या योजनेसाठी आवश्यक स्ट्रक्चर आज रोजी फक्त आपल्या संस्थेकडे आहे या योजनेमध्ये सरळ शेतकऱ्यांकडून हमीभावाने माल खरेदी करता येणार आहे. या योजनेचा लाभ संस्थेच्या सर्व शेतकरी सभासदांना थेट मिळावा म्हणून संचालक मंडळ सकारात्मक दृष्टिकोनातून विचार करीत असून शासनाबरोबर सदर उपक्रमात थेट सहभाग घेणार आहे.

आपली संस्था सामाजिक बांधिलकी सोबतच हिंदू संस्कृती जपण्याचा सुध्दा सुरुवातीपासून प्रयत्न करीत आली आहे. यासाठी कर्मचारी गणेशोत्सव, नवरात्र गरबा उत्सव याचे दरवर्षी आयोजन करण्यात येते. सद्‌भावना सेवा समितीच्या माध्यमाने भागवत कथा, रामकथा यांचे आयोजन सुध्दा आपण नेहमी करीत असतो. हिंदू संस्कृतीचा आधार चार वेद आहेत. या वेदांचे जतन व्हावे म्हणून संस्थेने बुलडाणा येथे वेद विद्यालय सुरु केले असून नुकतेच आचार्य स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या हस्ते विद्यालयाच्या वास्तूचा शुभारंभ करण्यात आला आहे. या वर्षी तीस विद्यार्थ्यांनी या वेद विद्यालयात प्रवेश घेतला आहे. याच ठिकाणीच संस्थेच्या वृध्द सभासदांसाठी अत्याधुनिक असा स्वर्गआश्रम सुरु करण्याची व्यवस्था पूर्ण झाली आहे. तसेच संस्थेचे तिरुपती येथे स्वमालकीची चार भक्तीनिवास सुरु असून माहुर येथे स्वमालकीचे भक्तनिवास, शिर्डी येथे साईभक्तांसाठी

स्वमालकीची भक्तनिवास सुरु आहे. याचा लाभ दरवर्षी हजारो भक्तगण घेत असतात. या तीन ठिकाणी भक्तांसाठी रुचकर असे महाराष्ट्रीयन भोजनाची उत्तम व्यवस्था संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे.

गेल्या ३४ वर्षापासून बुलडाणा अर्बन चा ग्राहक सभासदांना चांगली सेवा देण्याचा ध्यास राहिला आहे. सुरुवातीच्या काळापासून केलेल्या कठीण परिश्रमानंतर आपल्याला आजचे हे संस्थेचे मोठे वटवृक्षात झालेले रुपांतर बघावयास मिळत आहे. यामागे अनेकांचे परिश्रम, मेहनत व विश्वास आहे. संस्थेचा आर्थिक प्रगतीचा आलेख किती मोठा असला तरी संस्था आपल्या मुळ उद्दिष्टापासून किंचितही डगमगली नाही. संस्थेने आर्थिक क्षेत्राच्या माध्यमाने गरजू लोकांना आर्थिक पत पुरवठा केलेला आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांसाठी कर्ज, व्यावसायिकांसाठी कर्ज, नोकरदारांना किंवा इतर गरजू व्यक्तींसाठी कर्ज, बचत गट, छोट्या व्यावसायिकांसाठी कर्ज, वेअर हाऊसच्या माध्यमाने वेअर हाऊस तारण कर्ज, छोट्यामध्यमवर्गीय लोकांसाठी सोनेतारण कर्ज वितरीत केले आहे. इतरही पतसंस्था किंवा बँक त्यांच्या त्यांच्या छोट्यामध्यमवर्गीय आर्थिक गरजा पूर्ण करीत असतात पण आपण त्याहीपुढे जाऊन सोशल बँकिंगची संकल्पना आणली सहकाराच्या माध्यमाने समाजाच्या गरजा पूर्ण करुन सभासदांना चांगल्यात चांगली सेवा देण्याचा प्रयत्न बुलडाणा अर्बनच्या माध्यमाने आपण करीत आहोत.

केंद्र सरकारने सहकारी पतसंस्थांना वैद्यकिय महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्याचे धोरण अंगीकारले आहे. आपण आपल्या बुलडाणा अर्बन पतसंस्थेच्या वतीने वैद्यकिय महाविद्यालय सुरु करण्याच्या परवानगीसाठी सरकारकडे प्रस्ताव सादर करणार आहे. आपणास वैद्यकिय महाविद्यालय सुरु करण्याची परवानगी मिळाली तर गोरगरीब जनतेला अल्पदरात उच्च दर्जाच्या वैद्यकिय सेवा देण्याचा आपला माणस आहे. संस्थेचा ''ड्रिम प्रोजेक्ट'' म्हणून आपण वैद्यकिय महाविद्यालय लवकरच सुरु करु असा मला विश्वास आहे.

या आर्थिक वर्षामध्ये अनेक मान्यवरांनी आपल्या संस्थेच्या विविध उपक्रमांना प्रत्यक्ष भेटी दिल्या आहेत. त्यामध्ये केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री मा.ना.श्री. नितीनजी गडकरी, महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे अध्यक्ष मा.श्री. रामराजे निंबाळकर, माजी केंद्रीय मंत्री आनंदराव अडसूळ, भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष खा. रावसाहेब दानवे, महाराष्ट्राचे अन्न व औषध कॅबिनेट मंत्री मा.डॉ.ना.श्री. राजेंद्रजी शिंगणे, महाराष्ट्राचे माजी गृहराज्यमंत्री तथा नगर विकास राज्यमंत्री मा. रणजीत पाटील या मान्यवरांसह तिरुमला तिरुपती देवस्थानचे नवनियुक्त अध्यक्ष मा.श्री. छदलवाडा कृष्णमुर्ती यांनी संस्थेच्या विविध कार्यक्रम प्रसंगी उपस्थिती दिली आहे. या सर्व मान्यवरांचे मी आभार मानतो. केंद्र व राज्यातील सहकार आणि इतर विभागातील शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या नेहमीच्या सहकार्यामुळे संस्थेच्या प्रगतीचा वेग कायम वाढत राहत आला आहे. त्या सर्वांचे सुध्दा आभार मानणे हे माझे कर्तव्य आहे.

आपल्या संस्थेचे ठेवीदार, कर्जदार, संचालक, स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य, कर्मचारी दैनंदिनी प्रतिनिधी या सर्वांचे संस्थेवरील अतोनात प्रेम असेच वृध्दिंगत व्हावे ही अपेक्षा.

सर्व शाखांच्या अंतर्गत लेखापरिक्षण करणारे लेखापरिक्षक, विधिज्ञ, मूल्यांकनकर्ता यांचे सुध्दा मी आभार मानतो. संस्थेच्या आर्थिक व्यवहाराला योग्य दिशा आणि बळ देणारे वैधानिक लेखापरिक्षक मे.व्ही.आर.इनामदार ॲन्ड कंपनी (नागपूर) आणि मे. कासट तोतला ॲन्ड अचेलिया असोसिएटस् (जळगांव खां.) यांचे विशेष आभार...!

आपल्या सर्वांचा विश्वास आहेच, तो अधिक वृध्दिंगत व्हावा हीच प्रार्थना

**मै अकेला ही निकला था जानिबे मंजिल मगर**
**लोग आते गए और कारवॉ बनता गया...**

धन्यवाद !

जय सहकार...

स्नेहांकित

**राधेश्याम चांडक**
संस्थापक अध्यक्ष



**Radheshyam Chandak**
Founder Chairman

## *Monologue*

My Dear Member Brothers and Sisters....!

We are holding a public meeting of our Credit Society during this crisis of Corona epidemic. The global epidemic of Corona led to the bankruptcy of many, the loss of many jobs, and the loss of loved ones at home. In addition, this year's unseasonal heavy rains have also taken a heavy toll on farmers. On behalf of all of us, we first and foremost pay a heartfelt tribute to the innocent people who perished in the global epidemic of Corona.

The Indian economy has changed dramatically in the last three-four years. The banking sector has not escaped the impact of big decisions like denomination, GST, on the Indian economy. Whether the economy recovers or not, the epidemic of Covid-19 has shaken the entire world since December 2019. Millions of people around the world became infected with the corona, and millions of people in India also contracted the disease. Maharashtra has the highest number of Covid-19 patients in India and their number, is huge. India has the second highest number of corona patients in the world after the United States and the epidemic has had a major adverse effect on the Indian economy. Small and large companies as well as industries closed down and this had an adverse effect on the banking sector as well.

The NPAs of banks will increase in the financial year 2020-21, which will have an adverse effect on the profits of all banks and credit unions. Today, this epidemic doesn't seem to be under control by 2021. As an alternative, banks and credit societies will have to restructure their loans.

I am very happy to present the 34th Annual Report of our organization. Thirty four years have passed since the establishment of the organization. From the very beginning, the organization has given priority to customer

service and member interests. Today, the organization has expanded like a banyan tree and I am proud to say that all the members, directors and employees of the organization have a lion's share in this huge success of 463 branches, 668 warehouses, online services, and the business of Rs. 15,200 crore.

The organization has always made its mark through social initiatives. Even during the Corona period, we have distributed groceries and food grains to the workers during the lockdown, through our various branches. We have distributed groceries and essential items to about ten thousand needy families. After the permission of the government, all the food, snacks and drinking water were provided to the migrant workers from Maharashtra through the branches of our organization.

The organization has given priority to the interests of the farmers from the very beginning. We Launched Grameen Godown Yojana for farmer members. Today the organization has 668 godowns out of which 241 godowns are owned and 427 godowns are rented with the storage capacity of 94 Iakh 80 thousand quintals. This is benefiting all the farmer members of the organization. In addition, the organization has entered into agreements with the Cotton Corporation of India, Cotton Federation of Maharashtra and Olam Agro for storage of cotton in the warehouse of the organization, which is benefiting the farmers to a great extent. Buldana Urban is the only credit society in the state to implement a warehouse receipt scheme. Farmers are benefiting from the ups and downs in the market as they store their goods in warehouses. We provide immediate financial assistance to the farmers on these goods when required, so that their financial needs are met. As the society always implements various schemes keeping in view the interest of the farmer members, the society has set up a cold storage of 7,000 metric tons at Chikhli and following the demand of the members, a 5,000 MT cold storage has been set up at Malkapur which has been inaugurated by Dr. Rajendra Shingane, Cabinet Minister for Food and Drugs, Maharashtra. Cold storage of five thousand metric tons each is under construction at Wardha and soon our organization is setting up cold storage at Jalna as well. This will benefit the farmer members in the area.

The government is launching innovative initiatives to provide guaranteed prices to farmers and plans are being put in place to enable private sector organizations to purchase farmers' goods. Today only our organization has the necessary structure for this scheme. Under this scheme, goods can be purchased directly from the farmers with guaranteed prices. The Board of Directors is positively considering the benefits of this scheme will be available, directly to all the farmer members of the organization and will directly participate in this initiative with the government.

Our organization has been trying from the very beginning to preserve Hindu culture along with social commitment. For this staff Ganeshotsav, Navratra Garba Utsav is organized every year. We also always organize Bhagwat Katha and Ramakatha through Sadbhavana Seva Samiti. The basis of Hindu culture is the four Vedas. In order to preserve these Vedas, the organization has started a Veda Vidyalaya at BuIdana and recently the school building has been inaugurated by Acharya Swami Govinddev Giriji Maharaj. Thirty students have been admitted to this Vedic school this year. Arrangements have been made to start an altra-modern Swarg Ashram for the elderly members of the organization at this place. The organization also has four self-owned bhaktinivas at Tirupati, a self-owned bhatinivas at Mahur, A self-owned bhaktaniwas for Sai devotees at Shirdi. Thouands of devotees take advantage of this every year. In these three places, the organization has made excellent arrangements of delicious Maharashtrian food for the devotees.

For the last 34 years, Buldana Urban has been striving to provide good service to its customer members. After a lot of hard work from the beginning, we are witnessing the transformation of today's

organization into a big banyan tree. This is due to the hard work, effort and faith of many people. No matter how big the graph of financial progress of the organization, the organization has not deviated from its original objective. The organization has provided financial credit to the needy through the financial sector.

It has disbursed loans to farmers, loans to professionals, loans to employees or other needy persons, savings groups, loans to small businesses, warehouse mortgage loans through warehouses, gold loans to small middle class people Other credit societies or banks cater to their small and middle class financial needs but we have gone beyond that and introduced the concept of social banking. Through Buldhana Urban, we are trying to provide better service to the members by meeting the needs of the society through cooperation

The central government has adopted a policy of allowing co-operative credit societies to start medical colleges. We are going to submit a proposal to the government for permission to start a medical college on behalf of our Buldana Urban Credit Society. If we get permission to start a medical college, we have the aim to provide high quality medical services to the poor at low cost. I am confident that we will soon start a medical college as a "dream project" of the organization.

During this financial year, many dignitaries have made direct visits to various activities of our organization. Cabinet Central Minister for Highways and Road Transport Hon'ble Shri. Nitin Gadkari, President of Maharashtra State Legislative Council Shri Ramraje Nimbalkar, former Cabinet Minister Anandraoji Adsul, former BJP Regional president & MP. Raosaheb Danve, Food and Drug Cabinet Minister of Maharashtra Dr. Rajendraji Shingane, Former Minister of State for Home Affairs and Urban Development of Maharashtra Hon. Ranjit Patil, along with the newly appointed President of Tirumala TirupatiDevasthan, Shri. Chhadalwada Krishnamurti has been present on the occasion of various programs of the organization. I would like to thank all these dignitaries. The pace of progress of the organization has been steadily increasing due to the regular co-operation of Central and State Co-operatives and government officials and employees in other departments. It is my duty to thank all of them.

Depositors, borrowers, directors, members of the local advisory committee, staff daily representatives, all of you are expected to grow in love with the organization.

I would also like to thank the auditors, jurists, appraisers who have conducted internal audits of all the branches. I would also like to thank specially to the Statutory Auditors M/s. V. R. lnamdar & Company (Nagpur) and M/s. Kasat Totla & Achelia Associates (Jalgaon Khan.), who give the right direction and strength to the financial affairs of the organization...!

Last but not the least, a humble request to all of you to keep showering upon us your enthusiasm forever and forever!

Thank you...!

Yours affectionate

Jay Sahakar...

**Radhyeshyam Chandak**
Founder Chairman



**डॉ. सुकेश झंवर**

चिफ मॅनेजिंग डायरेक्टर

## मनोगत

बंधू – भगिनींनो ...!

परम आदरणीय भाईजी, सन्माननीय विचारमंच आणि उपस्थित सज्जनहो...

कोरोनाच्या जागतीक महामारी नंतर आपणा सर्वांना फिनिक्स पक्षासारखी नवी भरारी घ्यावी लागणार आहे. आज जगातील सर्वच देशांची अर्थव्यवस्था कोलमडून पडते की काय असे चित्र दिसत आहे. लहान मोठे उद्योगधंदे बंद पडत आहेत आणि रोजगार कमी कमी होत आहे. अशा प्रसंगी सगळ्या बँका आणि पतसंस्था यांना या वर्षी फार मोठ्या आर्थिक संकटांना समोरे जावे लागणार आहे. आपण सुध्दा या सर्व संकटांवर मात करुन पुढे जात आहोत ही खरोखरच आशादायक बाब आहे.

आपले कुशल नेतृत्व परम आदरणीय भाईजी यांनी ३४ वर्षापूर्वी १५ ऑगस्ट १९८६ ला केवळ १२ हजार भागभांडवल आणि ७२ सभासदांवर आपली बुलडाणा अर्बन को–ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी स्थापन केली. आज तिचा वटवृक्ष झाला आहे. संपूर्ण देशभर ४६३ शाखा आणि १२ लाख सभासद आहेत. कोअर बँकिंगमध्ये ऑनलाईन ४५२ शाखा जोडण्यात आलेल्या आहेत.

संस्थेने सभासदांसाठी आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी. (इन्कमिंग/आऊटगोईंग) या सुविधा सुरु केल्या आहेत. संस्थेच्या सभासदांसाठी ऑनलाईन व्यवहार करण्याकरीता संस्थेने नेट बँकिंग सेवा सुरु केली आहे, याचा लाभ १५००० सभासदांनी या वर्षी घेतला आहे. या आर्थिक वर्षात आर्थिक मंदी असताना सुध्दा तेराशे कोटीच्या ठेवींमध्ये वाढ झाली आहे. तोच आलेख कायम असून एप्रिल २०२० पासून ते सप्टेंबर २०२० पर्यंत संस्थेच्या ठेवी ८०० कोटींने वाढल्या आहेत. आज रोजी संस्थेच्या ठेवी ९२०० कोटीच्या वर गेल्या आहेत. ९२०० कोटी रुपयांची ठेव असणारी भारतामधील बुलडाणा अर्बन पतसंस्था ही एकमेव पतसंस्था

आहे, याचे सर्व श्रेय आपल्या संस्थेवर विश्वास व्यक्त करणाऱ्या सर्व ठेवीदारांना आणि कर्मचारी – संचालक मंडळांना जाते, हे मी नम्रतेने नमूद करतो.

संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था सध्या विस्कळीत झाली आहे. गेल्या दहा महिन्यांपासून संपूर्ण आर्थिक व्यवहार मोठ्या प्रमाणावर ठप्प आहे. अर्थव्यवस्था सुरळीत होण्यासाठी बराच कालावधी लागेल, अशाही या परिस्थितीत संस्था नियोजित २५ शाखा लवकरच सुरु करणार असून त्या माध्यमातून रोजगार निर्मितीला प्राधान्य देणार आहे.

०१ एप्रिल २०२० पासून संस्थेच्या ठेवीदार सभासदांसाठी चाळीस हजारांपेक्षा जास्त व्याज होत असेल तर त्यांना देण्यात येणाऱ्या व्याजातून दहा टक्के टीडीएस कपात सुरु झाली आहे. हा बदल संस्थेच्या सभासदांनी सहज स्वीकारला असून ०१ एप्रिल २०२० पासून आजपर्यंत आठशे कोटी रुपयांची ठेवी सुध्दा वाढल्या आहेत.

संस्थेने शेतकरी सभासदांसाठी सोने तारण कर्जाचे व्याजदर कमी करुन दर साल दर शेकडा दहा टक्क्यांपर्यंत खाली उतरवले आहे. याचा लाभ ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाला मोठ्या प्रमाणावर होत आहे. सुरुवातीपासून पतसंस्था ही लघु उद्योजक व शेतकऱ्यांच्या हिताला अग्रक्रम देत आली आहे.

वैद्यकिय क्षेत्रातील उच्च शिक्षणासाठी परराज्यात जाणाऱ्या बुलडाणा व विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी सहकार विद्या मंदिर, बुलडाणा येथे कोटा येथील अतिशय दर्जेदार शिक्षण पध्दती म्हणून नावाजलेले मोशन क्लासेस आपण सुरु केले आहेत. सुमारे चारशे विद्यार्थ्यांनी सध्या मोशन क्लास मध्ये प्रवेश घेतलेला आहे. मागील वर्षी NEET/JEE/AIEEE साठी जवळपास १५० विद्यार्थी पात्र झाले आहेत. सहकार विद्या मंदिर मोशन क्लासेस मध्ये शिकण्यासाठी आलेले सर्व शिक्षक हे आय.आय.टी. गॅज्युएट, पी.एच.डी व अनुभवी आहेत. या ठिकाणी आपण किफायतशीर दरात उत्तम व आधुनिक शैक्षणिक सुविधेसह मुलींची निवासाच्या दृष्टीने वस्तीगृहाची उत्तम सुविधा आणि दर्जेदार भोजन सुविधेसह प्रशस्त क्रीडांगण विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

सहकार विद्या मंदिर, बुलडाणा येथे शैक्षणिक सत्र २०२०–२१ पासून सहकार डिफेन्स अकॅडमीच्या माध्यमातून एन.डी.ए./एन.ए.चा दोन वर्षाचा कोर्स सुरु करण्यात आला आहे. सहकार विद्या मंदिर येथे शैक्षणिक सत्र २०२०–२१ सहकार डिफेन्स अकॅडमी अंतर्गत NDA/NA या UPSC द्वारा आयोजित केल्या जाणाऱ्या परिक्षांची पूर्वतयारी करुन घेतली जाणार आहे. भारतीय संरक्षण दलात अधिकारी पदावर महाराष्ट्रातील व प्रामुख्याने विदर्भातील जास्तीत जास्त तरुणांना संधी मिळावी व त्यांच्या हातून या भारत मातेच्या संरक्षणाचे पवित्र व अभिमानास्पद कार्य घडावे या उद्देशाने आपण प्रयत्न सुरु केले आहेत. याचा लाभ ग्रामीण भागातील व शहरी भागातील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर होत आहे ही समाधानाची बाब आहे.

संस्थेने आपल्या सभासदांसाठी कोणत्याही बँक खात्यातून पैसे विड्रॉल करण्यासाठी Hitachi या कंपनीसोबत करार केला असून Hitachi कंपनीचे संस्थेच्या २१ शाखांच्या ठिकाणी एटीएम बसविण्यात आले आहेत व अजून जवळपास पंचवीस ग्रामीण भागाच्या शाखांमध्ये अशा प्रकारचे एटीएम बसवण्याची व्यवस्था आपण लवकरच करणार आहोत.

संस्थेने सभासदांसाठी संस्थेच्या सर्व शाखांवर विद्युत बिल स्वीकारण्याची सुविधा सुरु केली आहे. त्यासाठी महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी सोबत आपण करार सुध्दा केला आहे. बुलडाणा येथील सभासदांसाठी पर्यटननाला प्रोत्साहन देण्यासाठी ज्ञानगंगा अभयारण्यात जंगल सफारीचे आयोजन अल्पदरात संस्था करते. यामध्ये यावर्षी जवळपास एक हजार पर्यटकांनी त्याचा लाभ घेतला आहे. आपल्या संस्थेने शेतकरी सभासदांसाठी शेतीला जोडधंदा म्हणून अमर डेअरी बोदवड यांच्याशी करार करुन शेतकऱ्यांना दुभते जनावरे कर्ज रुपाने वाटप केले असून दररोज १५०० लिटर दूध संकलन केले जात आहे. सदर प्रकल्प प्रायोगिक तत्वावर डोंगर खंडाळा येथे राबविला जात असून लवकरच इतर ठिकाणी सुध्दा अशाप्रकारे शेतकऱ्यांना जोडधंदा म्हणून गायी, म्हशी अशी दुभते जनावरे खरेदी करता कर्ज उपलब्ध करुन देण्यात येईल.

आपल्या संस्थेने हिंदुस्तान मायक्रो फायनान्स कंपनी लिमिटेड यांच्याशी करार केला असून प्रायोगिक तत्वावर बुलडाणा जिल्ह्यातील बचत गटांना लघुउद्योगासाठी सुमारे ५० कोटी कर्ज वाटप केले असून शंभर कोटी कर्ज वाटप करण्याचे उद्दिष्ट ठेवून या कंपनीमार्फत बचत गटांना लघु उद्योगासाठी कर्ज वितरीत करण्यात येणार आहे.

संस्थेने महाराष्ट्रातील पहिला आर.ओ. वॉटर एटीएम डोंगरखंडाळा येथे सुरु केला. गावकऱ्यांना शुध्द पिण्याचे पाणी नाममात्र ३० पैसे लिटर प्रमाणे पुरवण्यात येते. याचप्रमाणे संस्थेने इतर ७० ठिकाणी शुध्द पिण्याच्या पाण्याचे एटीएम सुरु केले त्यामुळे त्या त्या गावातील नागरिकांचे आरोग्य सुधारले असून पाण्यामुळे होणारे आजार नियंत्रणात आले आहे. संस्था अशा प्रकारचे पाण्याचे एटीएम अजून २५ ठिकाणी लावणार आहे.

संस्था आपल्या परिसरातील गरजेनुसार नाविन्यपूर्ण उपक्रम सातत्याने राबवत असते. त्याच धर्तीवर संस्थेने शेतकरी सभासदांसाठी माती परिक्षण (सॉईल डॉक्टर) ही योजना सुरु केली असून संस्थेच्या प्रत्येक शाखेच्या ठिकाणी शेतकरी सभासदांना अत्यल्प दरात माती परिक्षण करुन देण्यात येत आहे, याचा लाभ हजारो शेतकरी सभासद घेत आहेत.

आपल्या संस्थेचे जाळे ग्रामीण भागात अतिशय घट्ट विणले असून ग्रामीण भागातील सभासदांच्या गरजा जाणून घेऊन त्यांना सामाजिक उपक्रमांतर्गत विविध सोयी उपलब्ध करुन देणे, ग्रामीण भागात संस्थेच्या शाखेमार्फत ग्रामसभांचे आयोजन करण्यात येत असून सभासदांना विविध योजनांची माहिती देण्यात येत आहे. संस्थेच्या सर्व शाखांवर दरमहा गावात ग्रामसभांचे आयोजन करण्यात येत असून आतापर्यंत ६१६३ ग्रामसभांचे आयोजन आपल्या पुढाकाराने करण्यात आले आहे.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने बुलडाणा अर्बनची विकासात्मक वाटचाल अशीच प्रगतिपथावर राहील हा विश्वास मी आपणास देतो. सर्वत्र अंधार आहे हे जरी मान्य असले तरी...

**माना है की सब तरफ अंधेरा है ।**

**लेकिन दिया जलाना कहा मना है ।**

या तत्त्वानुसार आपण प्रगतीपथावर आपली वाटचाल अशीच सुरु ठेवू या...

आपल्या संस्थेवर विश्वास असलेल्या सर्व सामान्य सभासदांच्या विश्वासाला तडा जाणार नाही याची आपण सर्वजण मिळून दक्षता घेऊन या....

धन्यवाद !

जय सहकार, जय जगत.

आपला स्नेही

**डॉ. सुकेश झंवर**
चिफ मॅनेजिंग डायरेक्टर



**Dr. Sukesh Zamwar**
Chief Managing Director

## *Monologue*

My Dear Brothers and sisters
Respected Bhaiji, Respected Thought Forum

After the global epidemic of Corona, we all have to take a new leap like the Phoenix. Today, the picture is that the economies of all the countries of the world are collapsing. Small and large businesses are closing down and employment is declining. In such a scenario, all banks and credit socities will have to face huge financial crises this year. It is truly hopeful that we, too, will overcome all these difficulties and move forward.

Respected Bhaiji founded Buldana Urban Co-operative Credit Society 34 years ago on 15th August 1986 with a capital of only 12,000 shares and 72 members. Today it has become huge a banyan tree. There are 463 branches and 12 lakh members across the country. There are 452 online branches connected to Core Banking.

The organization provides facilities of R.T.G.S., NEFT (Incoming / Outgoing) for our members. The organization has launched a net banking service for online transactions for our members, which has benefited 15,000 members this year. Despite the economic downturn this year, deposits have increased by Rs 1300 crore. The same graph is maintained and from April 2020 to September 2020, the society's deposits have increased by Rs. 800 crore. Today,

the Society's deposits have crossed Rs 9,200 crore. Buldana Urban Credit Union is the only credit union in India with a deposit of Rs 9,200 crore. I humbly mention that all the credit for this goes to all the depositors Who 'believe in your organization and the staff, the board of directors.

The entire world economy is currently in disarray. The entire financial transaction has been largely stalled for the last ten months.. It will take a longtime for the economy to recover. In such a scenario, the organization is soon going to start 25 planned branches and will give priority to job creation through them.

From 1st April 2020, ten per cent TDS deduction has been introduced from the interest paid to the depositor members of the society if the interest is more than forty thousand. This change has been easily accepted by the members of the society and from 01st April 2020 till today the deposits of Rs. 800 crore have also increased.

The organization has reduced the interest rate on gold mortgage loans for farmer members to 10 per cent per annum. This is benefiting the farming community in rural areas to a large extent. From the very beginning, society has been giving priority to the interests of small entrepreneurs and farmers.

We have started Motion Classes which is renowned for its high quality teaching methods at kota, now we have started it at Sahakar Vidya Mandir, Buldana for the students from BuIdana and Vidarbha who are going abroad for higher education in the field of medicine. About four hundred students are currently enrolled in motion classes. About 150 students have qualified for NEET/JEE/AlEEE last year. All the teachers who came to teach in Sahakar Vidya Mandir Motion Classes are I.I.T. Graduates, Ph.D. and good experienced At this place, we have provided the best dormitory facilities for the girl's accommodation with good and modern educational facilities at affordable rates and a spacious courtyard with quality dining facilities for the students.

NDA / NA two year course has been started from the academic session 2020-21 at Sahakar Vidya Mandir, Buldana with the help of Sahakar Defense Academy. At Sahakar Vidya Mandir, academic session 2020-21 will be held under Sahakar Defense Academy to prepare for the examinations to be conducted by UPSC, NDANA. We have started Our efforts with the objective of giving opportunity to as many young people from Maharashtra and mainly Vidarbha as officers in the Indian Defense Forces and to carry out the sacred and proud task of protecting Mother India through them. It is a matter of satisfaction that this is benefiting a large number of students in rural and urban areas.

The organization has entered into an agreement with Hitachi to withdraw money from any bank account for its members. ATMs have been set up at 21 branches of society and another 25 such branches will be set up in rural areas.

The society has started a facility for its members to accept electricity bills at all branches. For this, we have also signed an agreement with Maharashtra Electricity Distribution Company. The organization organizes jungle safaris at Dyanganga Sanctuary at low cost to promote tourism for the

members of Buldana. It has benefited nearly a thousand tourists this year. Our organization has entered into an agreement with Amar Dairy Bodwad as a side business for the farmers and has distributed dairy cattle to the farmers in the form of loan and 1500 liters of milk is being collected daily. The project is being implemented on an experimental basis at Dongar Khandala and soon loans will be made available to farmers in other places for the purchase of dairy cattle such as cows and buffaloes.

Our organization has entered into an agreement with Hindustan Micro Finance Company Limited and on an experimental basis, about 50 crore loans have been allotted to the self help groups in Buldhana district for small scale industries with the aim of disbursing Rs 100 crore in loans, the company will disburse loans to small groups for small scale industries.

The organization has started the first RO Water ATM in Maharashtra at Dongarkhandala. The villagers are provided pure drinking water at a nominal rate of 30 paise per liter. Similarly, the organization has started ATMs for pure drinking water at 70 other places, which has improved the health of the villagers and brought water borne diseases under control. The organization will install such ATMs in 25 more places.

The organization is constantly implementing innovative initiatives as per the needs of the area. In the same vein, the Society has started a Soil Doctor Scheme for the members of the Society. Thousands of farmer members are taking advantage of the fact that soil testing is being done at low cost to the farmer members at every branch of the society.

The network of our organization is very strong in the rural areas. It knows the needs of the members in the rural areas and provides them various facilities under social activities. Village meetings are being organized in the rural areas through the branch of the.organization and the members are being informed about various schemes and so far 6163 village meetings (Gram Sabhas) have been organized on our initiative.

I assure you that with the cooperation of all of you, the developmental path of Buldana Urban will continue in the same direction. Although it is accepted that there is darkness everywhere…

**माना है की सब तरफ अंधेरा है ।**
**लेकिन दिया जलाना कहा मना है ।**

According to this principle, let us continue our path of progress in the same way

Let us all take care that the trust of all the ordinary members who have faith in our organization will not be shattered...

Thank you !

Jai Sahakar, Jai Jagat.

Yours affectionately,

**Dr. Sukesh Zamwar**
Chief Managing Director

**बुलडाणा अर्बन**
को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., बुलडाणा
मल्टिस्टेट रजि. नं. २६७

**Buldana Urban**
Co-op. Credit Society Ltd., Buldana
Multi-state R. No. 267

कार्यक्षेत्र : महाराष्ट्र, मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, गुजरात, आंध्रप्रदेश, गोवा, अंदमान आणि निकोबार

# ✻ वार्षिक साधारण सभेची सुचना ✻

(फक्त सभासदांसाठी)

**रविवार, दि. २७ डिसेंबर २०२०**

जा.क्र. :- ९८९/२०-२१ दिनांक : २४ ऑक्टोंबर २०२०

सन्माननीय सभासद,

बुलडाणा अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी म.बुलडाणा (मल्टीस्टेट) र.नं. २६७ या आपल्या संस्थेची वार्षिक साधारण सभा **रविवार, दिनांक २७ डिसेंबर २०२०** रोजी 'सहकार विद्या मंदिर', चिखली रोड, बुलडाणा या ठिकाणी दुपारी ४.०० वाजता आयोजित केली आहे. या सभेस आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

**मा. संचालक मंडळाचे आदेशानुसार....**

**डॉ. सुकेश झंवर**
चिफ मॅनेजिंग डायरेक्टर

## ✻ सभेपुढील कामकाजाचे विषय ✻

१) मागील दिनांक २२ सप्टेंबर २०१९ रोजीच्या वार्षिक साधारण सभेचे प्रतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दिनांक ३१/०३/२०२० अखेर सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील संस्थेच्या जमा-खर्च, नफा-तोटा व ताळेबंद पत्रकास मंजुरी देणे.
३) संचालक मंडळाची सभा दि. १५/०६/२०२० ठराव क्र. १६ नुसार केलेल्या शिफारशीप्रमाणे सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षासाठीच्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.
४) संचालक मंडळाची सभा दि. १५/०६/२०२० ठराव क्र. १७ नुसार केलेल्या शिफारशीप्रमाणे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाच्या मंजुर अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
५) संचालक मंडळाची सभा दि. १५/०६/२०२० ठराव क्र. १८ नुसार केलेल्या शिफारशीप्रमाणे नफा विभागणीस मंजुरी देणे.
६) सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाच्या अंकेक्षण अहवालास मंजुरी देणे व सन २०१८-२०१९ या अंकेक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे.
७) सन २०२०-२०२१ या वर्षासाठी संस्थेची बाहेरील कर्जमर्यादा निश्चित करणेबाबत विचार करणे.
८) संस्थेचे संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांचेकडील दि. ३१/०३/२०२० अखेर येणे कर्जाचा अहवाल सादर करणे.
९) दि मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटीज ॲक्ट २००२ अन्वये सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता लेखा परीक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनतनामा ठरविणे.
१०) संस्थेच्या संचालक सदस्यांचे नातेवाईक असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी प्रसिध्दी करणे.
११) संस्थेचे उपविधी क्र. १ (iv) Area of Operation, संस्थेचे उपविधी क्र. १५ Authorised Share Capital संस्थेचे उपविधी क्र. ३२ Board of Directors मधे दुरुस्ती करणे.
१२) संस्थेची Subsidiary Company यांच्या सन २०१९-२० च्या आर्थिक पत्रके व अंकेक्षण अहवालास मान्यता देणे.
१३) सन २०१९-२०२० या आर्थिक वषात सभासदत्व रद्द झालेल्या सभासदांची यादी सादर करणे व त्यास मान्यता देणे.
१४) संस्थेची Subsidiary Company (बुलडाणा अर्बन मेडीकल ॲन्ड रिसर्ज इंस्टीट्युट) स्थापन करणेबाबत विचार करणे.
१५) मल्टीस्टेट को.ऑप सोसायटीज ॲक्ट २००२ मधील कलम १७ (ब) प्रमाणे संस्थेचे दोन बहुराज्ञीय संस्थेमध्ये विभागणी करणेबाबत विचार करणे.
१६) सभासदांनी सभेच्या तीन दिवस अगोदर लेखी स्वरुपात विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देणे.
१७) मा. अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय.

**टीप:- १) कोवीड-१९ या रोगाचा संपूर्ण देशात मोठ्याप्रमाणात प्रदुर्भाव झालेला आहे, त्यामुळे ऑनलाईन झुम ॲपद्वारे वार्षिक साधारण सभा घेण्यात येणार आहे. तरी सभासदांनी आपल्या मोबाईलवर झुम ॲप इंन्स्टॉल करावा व आपला व्हॉटस्ॲप मोबाईल नंबर जवळच्या शाखेत नोंदवावा त्यावर आपणास पासवर्ड व मिटींग आयडी पाठविण्यात येईल, त्याद्वारे आपण वार्षिक साधारण सभेत सहभागी व्हावे. २) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास तीच सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व वरील विषय चर्चिले जातील. २) सभेनंतर सर्व सभासदांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. ३) ज्या सभासदांना आपल्या सूचना मांडावयाच्या आहेत त्यांनी त्या सभेपूर्वी ३ दिवस लेखी स्वरुपामध्ये मुख्य कार्यालयामध्ये पाठवाव्यात. ४) संस्थेच्या उपविधीप्रमाणे जे सभासद सतत तीन वार्षिक साधारण सभांना गैरहजर राहतील त्यांचे सभासदत्व रद्द होवू शकते.**

# ✻Notice of the Annual General Meeting ✻

(Only for members)

Sunday 27th December 2020

Outward No.989/20-21 Date : 24th Oct. 2020

All Hon. Members

The Annual General Meeting of Buldana Urban Co-Op. Credit Society Ltd. Buldana R.No. 267 Will be held on **Sunday 27th December 2020 at 4.00 p.m.** at Sahakar Vidya Mandir, Vidya Nagari, Chikhali Road, Buldana All Society Members are requested to attend the A.G.M. Meeting.

**By Order of Board of Directors**

**Dr. Sukesh Zamwar**
Chief Managing Director

## ✻ Subject to be transacted ✻

1) To read and confirm the minutes of previous AGM held on 22th September 2019.
2) To confirm and accept the Balance Sheet, Profit & Loss and Receipt & Payment for the year ended on 31.03.2020.
3) To consider the Budget for the year 2020-2021 as per the recommendation of Board of Directors' meeting Dt.15.06.2020 (Vide resolution No. 16).
4) To sanction excess expenses over the Budget for the year 2019-2020 as per the recommendation of Board of Directors' meeting Dt. 15-06-2020 (Vide resolution No. 17)
5) To confirm and accept the profit appropriation as per the recommendation of Board of Directors' meeting Dt. 15-06-2020 (Vide resolution No. 18)
6) To approve statutory Auditor's Report for the year 2019- 2020 and confirm Audit Compliance Report for the year 2018-2019.
7) To sanction and fix the credit exposure limit for outside borrowing by the Society for the year 2020-21.
8) To produce detailed information of the outstanding loan to Directors and their relatives as on 31-03-2020.
9) To appoint Statutory Auditor for year 2020-2021 as per the Multi State Co-Op. Societies A ct. ,2002 and to decide upon their remuneration.
10) To declare list of employees who are the relatives of members of Board of Directors.
11) To amend the Bye Law of the Society No. 1 (iv) Area of Operation, Bye Laws of the Society No. 15 Authorised Share Capital, Bye Laws of the Society No. 32 Board of Directors.
12) To Confirm and accept accounts & audit report of subsidiary company of the Society for the year 2019-20.
13) To Provide the list of the members whose membership has been cancelled in the financial year 2019-2020.
14) To discuss about creating subsidiary Company of the Society (Buldana Urban Medical and Research Institute).
15) To discuss about splitting the Society into two Multi-State Co-Operative Societies as per Section 17 (B) of the Multi-State Co-operative Societies Act, 2002.
16) Discussion on queries from members received 3 days prior to the AGM
17) To consider any other matter with the permission of Hon. Chairperson

**Note : 1) The entire Country is suffering from outburst of Covid-19 pandemic. Therefore, the Annual General Meeting shall be conducted on Zoom App. All the members are requested to download and install Zoom App on their mobile and kindly register your Whatsapp Mobile Number at the nearest Branch of the Society. The password and meeting id of the Annual General Meeting will be sent to you on Whatsapp. All the members are requested to connect using such meeting id and password. 2) If the Quorum is not fulfilled then the meeting will be adjourned for half on hour and such adjourned meeting will then be held at the same date at the same place which will not require the quorum. 3) Meeting will be followed by dinner. 4) Members are requested to give a 3 days' notice to the Head office in case they require any information from the society 5) Membership will be dissolved if a member remains absent for AGM Conse cutively for 3 yrs. as per Section 29 of Multi-State Co-op. Soc. Act. 2002.**

transfer of assets, entries under reconciliation pending to be passed and Debit & Credit balance of branch adjustment amount appearing in the balance sheet, which is not ascertainable, the financial statements give the information required by the Act in the manner so required and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India.

Our opinion in the present report is based on the limited information, facts and inputs made available to us through electronic means by the society management. We wish to highlight that due to the COVID-19 induced restrictions on physical movements and strict timelines, the entire audit team could not visit the branch for undertaking the required audit procedure as prescribed under ICAI issued Standards on Auditing taking into due consideration of ICAI Advisory for Statutory Auditors.
(a) in the case of the Balance Sheet, of the state of affairs of the Society as at March 31, 2020,
(b) in the case of the Profit and Loss Account, of the profit for the year ended on that date.

**Report on Other Legal and Regulatory Requirements**

1. Subject to our comments and observations contained in Audit Memorandum (Part A,B and C), we report that:
   a) we have obtained all the information and explanations which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of our audit;
   b) in our opinion proper books of account as required by The Multi State Co-operative Societies Rules, 2002 and bye-laws of the society, have been kept by the Society so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of audit have been received from the branches not visited by us.
   c) the transactions appearing to us to be contrary to The Multi State Co-operative Societies Act and Rules, 2002 and bye-laws of the society, monies of the society appearing to be bad and doubtful of recovery, loans given by the society to the members of the board are given at Appendix-I attached herewith and forming part of this audit report. As informed by the management of the society no matter has been exclusively specified by the Central Registrar in respect of the society for the year under audit.
   d) the Balance Sheet and Statement of Profit and Loss dealt with by this Report are in agreement with the books of account.
   e) On the basis of written representation received from the directors of the Society and taken on record by the Board of Directors, we report that none of the Directors is disqualified as on 31st March 2020from being appointed as Director in terms of Clause of A sub-section 1 of Section 43 of the Multi-State Co-operative Societies Act, 2002.
   f) In our opinion, the Balance Sheet and the Profit & Loss Account dealt with by this report comply with the Accounting Standards issued by the Institute of Chartered Accountants of India in so far as they apply to the Co-operative Society (Credit Div.) except the following:

Prior Period Items (AS5): There is no practice of disclosing prior period items separately in the Profit & Loss Account as required by Accounting Standard – 5. Such amounts have been included in their natural heads of account and not separately disclosed in a manner that their impact on the financial results for the year can be perceived. The quantum is not ascertainable.

Employee Benefits (AS15): Separate disclosure of the employee benefits as laid down at the Accounting Standard (AS15) remains to be made in the financial statements.

Accounting for Taxes on Income (AS22): The deferred tax assets and deferred tax liabilities arising out of the timing difference remain to be recognised in the financial statements.

Financial Reporting Of Interest in Joint Venture (AS27): The disclosure requirements as laid down in the said standard remain to be adhered to, in totality.

In absence of adherence to the accounting standards mentioned above, its respective and total financial impact on the financial statements could not be perceived.

We further report that had the financial effect of Clause 1 and 17 of Appendix I forming part of this report been considered the Profit would have reduced by **Rs 19481694.25/-** with corresponding reduction in Reserve Funds.(calculation sheet enclosed).

**For**
**M./s. V.R.Inamdar And Co.**
**Chartered Accounts**

**(Anand Apte)**
**Partner**
**FRN No. 103743W**
**UDIN No:20040987AAAAL5546**

**Place : Nagpur**
**Dated : 20/10/2020**

## Balance Sheet as on 31st March 2020 ताळेबंद दि. ३१ मार्च २०२०

| Sr. No. | LIABILITIES | Schedule | Balance as on 31-03-2020 | Balance as on 31-03-2019 |
|---|---|---|---|---|
| 1 | Capital | 1 | 1325,147,400.00 | 1213,007,230.00 |
| 2 | Reserve & Surplus | 2 | 3714,849,842.86 | 3503,011,522.59 |
| 3 | Deposits | 3 | 84999,329,774.02 | 71032,416,867.48 |
| 4 | Borrowings | 4 | 5275,606,319.90 | 6817,127,282.98 |
| 5 | Other Liabilities & provisions | 5 | 6392,064,005.77 | 4921,674,202.59 |
| | **TOTAL CAPITAL & LIABILITIES** | | **101706,997,342.55** | **87487,237,105.64** |

| Sr. No. | ASSETS | Schedule | Balance as on 31-03-2020 | Balance as on 31-03-2019 |
|---|---|---|---|---|
| 1 | Cash & Balances | 6 | 1247,251,919.26 | 1100,804,361.85 |
| 2 | Balances With Banks & Money | 7 | 5214,099,075.34 | 6623,530,009.22 |
| 3 | Bank Investments, Other Inv. | 8 | 24097,118,386.43 | 15394,673,269.92 |
| 4 | Advances | 9 | 58270,748,343.86 | 53887,280,093.14 |
| 5 | Fixed Assets | 10 | 5326,906,683.14 | 4951,438,176.14 |
| 6 | Other Assets | 11 | 7550,872,934.52 | 5529,511,195.37 |
| | **TOTAL ASSETS** | | **101706,997,342.55** | **87487,237,105.64** |

